अपील अधिकारी तथा सामान्य प्रशासन विभाग
पुणे महानगरपालिका यांचे कार्यालय
शिवाजीनगर पुणे ४११००५
दूरध्वनी क्र. ०२०-२५५०११२३
ई मेल aadmcgeneral@punecorporation.org

अपील क्र.१०/२०२४

जा.क्र उआ(सा.प्र.)/ आस्था/१२४६६ दि. १६/२/२०२४

अपिलीय प्राधिकारी तथा उप आयुक्त , सामान्य प्रशासन विभाग, पुणे महानगरपालिका

अपील क्रमांक : पुणे मनपा/अ.प्रा.उआ(सा.प्र.)/अपिल/१०/२०२४

प्रति,

श्री.अतिश अडागळे,

४२५/२६, औद्योगिक वसाहत,

गुलटेकडी, पुणे-४११०३७

यांस

----------------- अपिलार्थी

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी
आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका

श्री.अतिश अडागळे, औद्योगिक वसांहत, गुलटेकडी, पुणे-४११०३७ (यापुढे अपिलार्थी म्हणून संबोधिले जातील) यांनी दि.२८/१२/२०२३ रोजी (आ.क्र.आस्था/१६३६५ दि.२८/१२/२०२३) माहिती अधिकार अधिनियम २००५ अन्वये अर्ज दाखल केला होता.

अपिलार्थी यांचे मूळ अर्जातील माहितीबाबत जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका यांनी जा.क्र.जमाअ/आस्था/११६३६, दि.२५/०१/२०२४ अन्वये अर्जास माहिती दिलेली आहे.

| माहिती अधिकारातील अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अर्जावरील दिनांक | अर्ज प्रत्यक्ष प्राप्त झाल्याचा दि. | माहिती द्यावयाचा अंतिम दि. | अपिलार्थीस उत्तर/माहिती पाठविल्याचा दि. | विलंब दिवस |
| २८/१२/२०२३ | २८/१२/२०२३ | २७/०१/२०२४ | २५/०१/२०२४ | ० |

अपिलार्थी यांनी “मुद्दा क्र.'क' व 'ड' वी माहिती न दिल्याने अपिल अर्जात नमूद करुन दि.०६/२/२०२४ रोजी (आ.क्र.१९०७९ दि.०६/२/२०२४) रोजी अर्ज दाखल केलेला आहे.

| अपिल अर्जाचा तपशील | | | | |
|---|---|---|---|---|
| अपील अर्जाचा दिनांक | अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दि. | अपील दाखल करावयाचा अंतिम दि. | अपील अर्ज मुदतीत दाखल केला आहे का? | अपील अर्जाच्या विलंब बाबत निवेदन दिले आहे का? |
| ०६/२/२०२४ | ०६/२/२०२४ | २५/०२/२०२४ | होय | होय |

अपिल दिनांक १६/०२/२०२४ रोजी सकाळी ११.३० वा. सुनावणी आयोजित करण्यात आली होती. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी ,आस्थापना विभाग, पुणे महानगरपालिका हे उपस्थित होते .

## विवेचन

अपिलार्थी यांनी "मुद्दा क्र.क व ड वी माहिती न दिल्याने श्री.अमर शिंदे यांचे अधिक्षक अभियंता पदाचे पदोन्नतीची संपूर्ण फाईलची प्रत मिळावी.श्री.अमर शिंदे यांचे अधिक्षक अभियंता पदासाठी शिफारस करणारे सेवक यांचे नाव व हुद्दा याचा तपशील मिळावा" असे अपिल अर्जात नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग पुणे महानगरपालिका यांनी माहिती अधिकारात अर्जास जा.क्र.जमाअ/आस्था/११६३६, दि.२५/०१/२०२४ रोजीचे पत्रान्वये दिलेले उत्तर व अपिलार्थी यांचे लेखी म्हणणे पुढील प्रमाणे.

| अ.क्र. | मुद्दा | माहिती/उत्तर |
|---|---|---|
| १ | श्री.अमर शिंदे यांचे अभियांत्रिकी पदवी कोणत्या झाली याची माहिती मिळावी | उपलब्ध असलेल्या माहितीच्या प्रतीची संख्या १ आहे |
| २ | श्री.अमर शिंदे यांनी अभियांत्रिकी पदवी कोणत्या महाविद्यालयातून घेतली याची माहिती मिळावी | |
| ३ | श्री.अमर शिंदे यांचे अधिक्षक अभियंता पदाचे पदोन्नतीची संपूर्ण फाईलची प्रत मिळावी | सदर प्रकरणी कार्यवाही चालू असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ (१)(झ) नुसार सद्यस्थितीत उपलब्ध करुन देता येणार नाही. |
| ४ | श्री.अमर शिंदे यांचे अधिक्षक अभियंता पदासाठी शिफारस करणारे सेवक यांचे नाव व हुद्दा याचा तपशील मिळावा. | सदर प्रकरणी कार्यवाही चालू असल्याने माहितीचा अधिकार अधिनियम २००५ चे कलम ८ (१)(झ) नुसार सद्यस्थितीत उपलब्ध करुन देता येणार नाही. |

अपिलार्थी यांनी "माहितीचे फक्त एक पान प्राप्त झाल्याबाबत" नमूद केले. मुद्दा क्र.१,२ ची माहिती उपलब्ध करुन देण्यात आली असून मुद्दा क्र.३ व ४ माहिती नाकारण्यात आली असल्याचे जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी यांनी नमूद केले. मुद्दा क्र.१ ते ४ बाबत स्पष्ट उत्तर तयार करुन माहिती उपलब्ध करुन देण्यात यावी. मुद्दा क्र.३ व ४ ची सार्वजनिक स्वरुपाची माहिती उपलब्ध करुन देणे शक्य असल्याने अशी माहिती उपलब्ध करुन देणेबाबत अपिलाधिकारी यांनी नमूद केले. सबब, पुढीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

अपिल मान्य करण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी तथा प्रशासन अधिकारी, आस्थापना विभाग, पुणे, महानगरपालिका यांनी मुद्दा क्र.१ ते ४ ची स्पष्ट उत्तर तयार करुन सार्वजनिक स्वरुपाची माहिती विनामूल्य अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात यावी. त्यानुसार, सदर अपिल क्र.१०/२०२४ निकाली काढण्यात येत आहे.

(सचिन इथापे)
अपिलीय प्राधिकारी तथा
उप आयुक्त (सामान्य प्रशासन)
पुणे महानगरपालिका

---

सदर माहितीने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यास ९० दिवसाच्या मुदतीत मा.आयुक्त, राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, पुणे, नवीन प्रशासकीय इमारत, ४ था मजला, पुणे-१ यांचेकडे व्दितीय अपिल करण्याबाबत माहिती अधिकार अधिनियम २००५ नुसार तरतुद आहे.

सदर निकालाची प्रत पुणे मनपाच्या www.punecorporation.org या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

**प्रत/-**
जन माहिती अधिकारी,
आस्थापना विभाग,
पुणे महानगरपालिका.